'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## मराठी विभाग

## जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने

**'कर्णबधीर शाळेस अभ्यास भेट'**

शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२

सकाळी ११.०० वाजता

**बातमी (दै. पुढारी, १०/१०/२०२२)**

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची लोहिया कर्णबधिर शाळेस भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील बी.ए. १ च्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने वि. म. लोहिया कर्णबधिर विद्यालयास भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी अध्ययन व अध्यापन पद्धतीच्या संदर्भात माहिती घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांना फळे व खाऊचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापकांनी संस्था, विद्यालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. अभ्यासभेटीत डॉ. स्वप्निल बुचडे, डॉ. दादासाहेब घाडगे यांच्यासह २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. अभ्यासभेटीचे नियोजन डॉ. प्रभा पाटील यांनी केले.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

विभागप्रमुख

मराठी विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

# मराठी भाषा गौरव दिन

# बातमी


## मराठी राजभाषा दिन विविध कार्यक्रमांनी साजरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी राजभाषा दिन शाळा, महाविद्यालयात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. ग्रंथदिंडी, भाषण यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करून मराठी भाषेविषयी जनजागृती करण्यात आली. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावरही कवी कुसुमाग्रजांच्या कविता, फोटो शेअर करून मराठी राजभाषा दिनाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**विद्यापीठ हायस्कूल**

मराठी राजभाषा दिनानिमित्त कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक एस. वाय. कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ए. सी. देसाई यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कार्याची ओळख करून दिली.



यावेळी उपमुख्याध्यापिका एस. व्ही. रणनवरे, उपप्राचार्य के. व्ही. भानुसे, पर्यवेक्षक बी. डी. गोसावी, एच. एम. गुळवणी आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना**

मराठी भाषा दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मराठी पाट्या असणाऱ्या दुकानदारांचा शहर उपाध्यक्ष सुनिल तुपे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी करण सकटे, विजय तहाळे, आदित्य पाटोळे,

- शाळा, महाविद्यालयांमध्ये भाषण, ग्रंथदिंडीचे आयोजन

अनिकेत माने, राज तहाळे, सिध्दू मधाळे, रोहन आवळे आदी उपस्थित होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

मराठी राजभाषा दिनानिमित्त कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. मराठी आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने 'माझी बोली माझा बाणा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ऋतुजा खरांबळे, साक्षी कोळी यांनी काव्यवाचन केले. प्रा. किरण पाटील यांनी मराठी राजभाषा दिनाचे महत्त्व सांगितले. यावेळी प्रा. संदीप पाटील, डॉ. आरिफ महात, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. नम्रता कुंभार, डॉ. मोहिनी कुदळे आदी उपस्थित होते.

**शाहू कॉलेज**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस डॉ. विजय वाडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुसुमाग्रजांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात दिलेले मोलाचे योगदान आणि लिहिलेली दर्जेदार पुस्तके याविषयी डॉ. वाडकर यांनी माहिती दिली. सांस्कृतिक व मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व उपप्राचार्य डॉ. सिधू आवळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. मानसी पुणतांबेकर, डॉ. एम. डी. कदम, डॉ. संपदा टिपकुर्ले, डॉ. महेश रणदिवे, प्रा. अंकुश घुले, प्रा. गणेश लवंगारे आदी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416003

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## मराठी विभाग

**आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या सामंजस्य कराराअंतर्गत**

**व्याख्यान**

## सुनीलकुमार लवटे : साहित्य आणि भूमिका

**शुक्रवार, ३० सप्टेंबर २०२२**

**सकाळी ९.३० वाजता**

**बातमी** (दै. सकाळ – ०२/१०/२०२२)

# माणूस म्हणून स्वत:ला सिद्ध करा

### प्रा. डॉ. मोरे : डॉ. लवटे साहित्यवर व्याख्यान

कोल्हापूर, ता. १ : 'डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आयुष्यात आंतरभारती ही संकल्पना स्वीकारून मानवतावाद आणि वैज्ञानिकदृष्टीच्या विकासासाठी प्रयत्न केले, विद्यार्थ्यांनी या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श घेऊन माणूस म्हणून स्वत:ला सिद्ध करावे, असे आवाहन प्रा. डॉ. गिरीश मोरे यांनी येथे केले.

विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे 'डॉ. सुनीलकुमार लवटे : साहित्य आणि भूमिका' या विषयावर बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'डॉ. लवटे यांचे साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल योगदान आहे. संपूर्ण जीवन त्यांनी वंचित, उपेक्षित घटकांच्या विकासासाठी व्यतीत केले. अनाथपण वाट्याला आले असताना पुढच्या काळात त्यांनी नाती शोधली. शिक्षण क्षेत्र निवडून स्वत: त्यांनी माणूसपण सिद्ध केले. समाधानी वृत्ती ठेवली, तर दु:ख होत नाही हा त्यांच्या साहित्याचा गाभा आहे. याचबरोबर माणसाची सकारात्मक वाढ होणे गरजेचे आहे. स्वत:च्या मेहनतीने



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात व्याख्यानात बोलताना डॉ. गिरीष मोरे

आपले जीवन उभे करता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. लवटे व त्यांचे कर्तृत्व आहे.'

प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले, 'परखड विचार मांडणारे व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. लवटे यांना ओळखले जाते. वास्तवाचे भान जपणारी व काळाची पावले ओळखून कृती आणि वृत्ती एकसारखी असणारी कोल्हापूर नगरीतील महत्त्वाची व्यक्ती म्हणून डॉ. लवटे यांची ओळख आहे.

मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. स्वप्निल बुचडे यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. डॉ. आरिफ महात, प्रा. डॉ. दादासाहेब घाटगे आदी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 ★ KOLHAPUR-416003 ★

विभागप्रमुख,
मराठी विभाग प्रमुख
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**मराठी विभाग**

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उद्घाटन समारंभ**

**१४ जानेवारी, २०२३**

**बातमी**

# चाकाच्या शोधापेक्षा भाषेचा शोध महत्वपूर्ण : प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर



कोल्हापूर : भाषेतून आपल्याला विचार व्यक्त करता येतात. भाषेची अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी आणि संवर्धनासाठी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. मानवी जीवनात भाषेबरोबर संस्कृतीला महत्वाचे स्थान आहे. वेगवेगळ्या संस्कृतीचे दर्शन साहित्यातून होत असते. जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास साहित्याची निर्मिती होते. अनुभवातून साहित्याची निर्मिती होत असते. लिहिणं आणि जगणं वेगळं करता येत नाही. पुस्तकं ही जीवनाकडे पाहण्याची खिडकी आहे. भाषेतून साहित्याची निर्मिती होते असे म्हणत चाकाच्या शोधापेक्षाही भाषेचा शोध महत्वपूर्ण असे प्रतिपादन प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी केले. ते विवेकानंद कॉलेज मधील मराठी विभाग आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उद्घाटनप्रसंगी 'मराठी भाषा : साहित्य आणि संस्कृती' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी महाविद्यालयीन जीवन महत्वपूर्ण असून त्याला आकार देण्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे. साहित्याची निर्मिती होत असताना मनामध्ये उर्मी असायला लागते. साहित्याची निर्मिती प्रक्रिया समजून घेण्यात सामान्य वाचकाला आनंद मिळत असतो. जिद्द आणि चिकाटीच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते, असे मत मांडले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारंभाचे उदघाटन रोपट्यास पाणी घालून व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. स्वप्निल बुचडे यांनी केले. याप्रसंगी डॉ. कविता तिवडे, प्रा. बी. एस. लाड, प्रा. सनी काळे, प्रा. समीक्षा फराकटे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**दि. १८ जानेवारी, २०२३ रोजी दै. 'द ग्लोबल टाईम्स' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी.**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964